**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, सोलापूर यांचे न्यायालय**

**सं. फौ. ख. क्र. १४४७/२०२४**
**नि.क्र.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | १९/०३/२०२४ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | १९/०३/२०२४ |
| ३. | फिर्यादीचे नांव | : | सरकार तर्फे पो.नि.<br>फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर. |
| ४. | आरोपीचे नांव | : | सुनिल अंबदास भिसे,<br>वय–४८ वर्षे, व्यवसाय– सोडा विक्री,<br>रा. गौरीनंदन अपार्टमेंट, मनिषा नगर, वेट नं.०२,<br>ठाणे.<br>सध्या रा. जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर. |
| ५. | कलम व अधिनियम | : | महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०२/११७ |
| ६. | गुन्हयाचे विवरण | : | |

दिनांक १९/०३/२०२४ रोजी २१.२० वाजताच्या सुमारास, मुरारजी पेठ, सुपर मार्केट समोर, सोलापूर येथे तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील हातगाडीवर सोडा विक्री करुन सदरचा हातगाडा हा सार्वजनिक रोडवर लावून येणारे जाणारे लोकांना रहदारीस व वाहतुकीस अडथळा निमार्ण करीत असताना मिळून आलात व त्यानुसार महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०२/११७, खालील गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

(पॅनल प्रमुख)
राष्ट्रीय लोकअदालत
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सोलापूर.

दिनांक – २२/०३/२०२५.

आरोपीचे निवेदन–

प्रश्न १. – तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न २ – तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचून दाखवला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय.

समक्ष

..............................

आरोपीची सही

(पॅनल प्रमुख)

राष्ट्रीय लोकअदालत

दिनांक – २२/०३/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सोलापूर.

## न्या य नि र्ण य

(दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी जाहीर)

सदर आरोपीविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२/११७ खालील आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपी स्वेच्छेने गुन्हा कबूल करत आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला असल्यामुळे सरकार पक्षाची केस निर्विवादपणे सिध्द झालेली आहे. आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे तसेच तो त्याचे कुटुंबातील एकमेव कर्ता/कमावता इसम असल्यामुळे खालील शिक्षा न्यायोचित होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

आरोपीस फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २५२/भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ कलम २७५ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२/ ११७ च्या आरोपाकरीता दोषी धरून रक्कम रु.२००/– (रक्कम रुपये दोनशे) द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर द्रव्य दंडाची रक्कम न भरल्यास त्यास ०२ (दोन) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर. )

(पॅनल प्रमुख)

राष्ट्रीय लोकअदालत

दिनांक – २२/०३/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सोलापूर.